

# तिन्ही नगरपरीषदमध्ये कमळाची सत्ता आणा; विकासाची हमी मी देतो : मुख्यमंत्री






**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

दोन डिसेंबर पर्यंतची कमळाच्या उमेदवाराची चिंता दूर करा व त्यांना विजयी करा विकासाचा अजेंडा व कामे करन्याची ताकद आम्ही पुर्ण करु गावाच्या विकासाचा भाजपाचा संकल्प असून त्यासाठी हिवरखेड तेल्हारा अकोट इथे नगराध्यक्ष सह नगरसेवक पदाचे सर्व उमेदवारांना विजयी करा असे आव्हान राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडणवीस यांनी केले. हिवरखेड येथे केवल वसंतराव देशमुख यांच्या मळा बस स्टॅड येथे हिवरखेड तेल्हारा अकोट नगरपालिकेच्या भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित संवाद मतदार विजय संकल्प सभेत ते बोलत होते. मंचावर भाजपा प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर पालकमंत्री ऍडव्होकेट आकाश फुंडकर, खासदार अनुप धोत्रे ,आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार संजय कुटे, जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर विजय अग्रवाल अनिल काळे, अनिल गावंडे, सुलभाताई धुंडे नगराध्यक्ष उमेदवार मायाताई घुले, वैशालीताई पालीवाल शेंडे, मंगेश दुतोंडे धन्नालाल टावरी गणेश रोठे, गोपाल म होळ अनिल दादा गावंडे अमित कावरे माधव मानकर, गिरीश जोशी, किरण सेदानी, सागर राऊत, डॉक्टर संजय शर्मा, देवाशिष काकड, अनिल तिवारी, अतुल अग्रवाल, उमेश पवार, संजय जोशी, आदी मंचावर विराजमान होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देशात शहरी आणि ग्रामीण भागाच्या विकासाचा संकल्प व विकासाची सुरुवात व ट्रिबल इंजन लावण्यासाठी तसेच नागरी समस्या सोडवण्यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारने दिलेले पैसे विकासाच्या कामाला लावण्यासाठी आपण इथे भारतीय जनता पक्षाला विजयी करा. हिवरखेड अकोट तेल्हारा रोड करण्यात येईल तसेच रेल्वे लाईन काम सूरु होऊन त्याच्या माध्यमातून शेतकऱ्यांनाचा माल सर्वसामान्यांना सुविधा उपलब्ध करून पोहोचवण्याचं काम भारतीय जनता पार्टी सरकार करणार आहेत तसेच शेतकरी हितार्थाने कामे घेण्यात येईल असेही अभिवचन नामदार देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिले यावेळी पालकमंत्री ऍडव्होकेट आकाश कुंडकर यांनी जोश पूर्ण भाषणात भाजपा उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले तर प्रास्ताविक खासदार अनुप धोत्रे यांनी यांनी केले तर आमदार प्रकाश भारताकळे यांनी हिवरखेड तेल्हारा अकोट या भागातील अनेक सम स्या संदर्भात मागणी केली आणि त्यासंदर्भात त्याला सकारात्मक उत्तर मुख्यमंत्री यांनी देऊन आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या कार्याची प्रसंशा केली. आमदार रणधीर सावरकर यांच्या नेतृत्वात तसेच खासदार अनुप धोत्रे आमदार प्रकाश भारसाकळे यांच्या प्रयत्नाने हिवरखेड येथे भव्य दिव्य सभा ऐतिहासिक सभा झाली यावेळी मोठ्या संख्येने ग्रामीण भागातील आणि तेलारा हिवरखेड अकोट नगरपालिका क्षेत्रातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते भारतीय जनता पक्षाच्या या नियोजनामध्ये २००० कार्यकर्त्यांनी हा कार्यक्रम यशस्वी केला यावेळी चांदीची गदा त्याच्यावर कमळ असलेलं भाजपाच्या वतीने देण्यात मुख्यमंत्र्यांना देण्यात आली. आमदार सावरकर यांनी उपस्थित कार्यकर्ते तसेच मतदारांना त्यांना प्रत्येक मैदानावर जाऊन वंदन नमन करून भारतीय जनता पक्षाच्या उमेदवाराला मतदान जोगावा मागितला. सतत दहा मिनिट मिनिट मुख्यमंत्री आमदार सावरकर अनुप धोत्रे प्रकाश भारसाकळे चर्चा विनिमय केला व या भागाच्या परिस्थिती व विकासाचे कामा संदर्भात आढावा घेतला. मुख्यमंत्र्यांनी आयोध्या येथील श्री राम लला मंदिराच्या धर्म ध्वजाचा उल्लेख करतात जय श्रीराम गगनभेदी नाऱ्यांनी परिसर दुमदुमले हिवरखेड अकोट तेलारा या भागातील १५ किलोमीटर एरिया संपूर्ण भाजपामय झाले होते. यावेळी अकोट तेल्हारा, हिवरखेड येथील वचननामा प्रकाश भारसाकळे व नामदार फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशीत करण्यात आले.

## देखभाल दुरूसेतीसाठी शहराच्या या भागातील वीज पुरवठा राहणार बंद

### वीज ग्राहकांनी सहकार्य करावे ;महावितरण

**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

शहरातील महावितरणच्या ११ केव्ही राजपुतपुरा फिडरच्या देखभाल दुरूस्तीचे काम महावितरणने हाती घेतले आहे. त्यामुळे उद्या बुधवार (दि.२६) ला सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत हे फिडर बंद राहणार आहे. त्यामुळे या फिडरवरून वीज पुरवठा होणाऱ्या क्षेत्रातील ग्राहकांचा वीज पुरवठा बंद राहणार आहे.महावितरणने हाती घेतलेले देखभाल दुरूस्तीचे काम हे ग्राहकांना सुरळीत वीज सेवा देण्यासाठी आवश्यक आहे. त्यामुळे या काळात ग्राहकांनी सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणच्या ११ केव्ही राजपुतपुरा फिडरवरून राजपुतपुरा, वसंत टॉकीज परिसर, खिडकीपुरा, वर्धमान भवन परिसर, किल्ला चौक, जय हिंद चौक, राम नगर आणि काळा मारूती परिसर या भागाला वीज पुरवठा होत असल्याने या संपूर्ण भागाचा वीज पुरवठा उद्या सकाळी १० ते दुपारी २ वाजेदरम्यान बंद राहणार आहे. अखंडित वीज सेवेसाठी महावितरणच्या वीज वाहिन्यांची वेळोवेळी देखभाल दुरूस्ती करावी लागते,शिवाय यामुळे वीज यंत्रणेचे होणारे मोठे नुकसान टाळल्या जाते ,परिणामी वीज ग्राहकांना दर्जे दार वीज पुरवठा होण्यास मदत होते.

## आचारसंहिता कालावधीत जिल्हा लोकशाहीदिन नाही

**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये दि. ३ डिसेंबरपर्यंत आचारसंहिता असल्यामुळे जिल्हा लोकशाहीदिन आयोजित करण्यात येणार नाही.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत मतदारांवर प्रभाव पडेल असे कोणतेही निर्णय घेता येत नाहीत.

नगरपंचायत, नगरपरिषद निवडणुकीसाठी दि. २ डिसेंबरला मतदान, दि. ३ डिसेंबरला मतमोजणी व निकाल व दि. १० डिसेंबरपूर्वी शासन राजपत्रात निकाल प्रसिद्ध करण्यात येणार आहे. आचारसंहिते मुळे या कालावधीत लोकशाहीदिन होणार नाही, असे जिल्हा प्रशासनातर्फे कळिवण्यात आले आहे.

## ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग यंदा घरपोच मतदान पासून वंचित ?

**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

मागील लोकसभा आणि विधानसभा निवडणुका वेळी ज्येष्ठ नागरिक, ४० ते १००३ अपंगत्व असलेले आणि हृदयरोग कर्करोग इत्यादी गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्यांना घरपोच मतदानाची सुविधा देण्यात आली होती त्यामुळे या सर्व ज्येष्ठ नागरिक दिव्यांग तसेच दुर्धर आजाराने ग्रस्त मतदारांना दिलासा मिळाला होता. घरबसल्या मतदान करायला मिळाल्याने अशा व्यक्तींच्या मतदानात वाढ सुद्धा झाली होती लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत घरपोच मतदान उपलब्ध असल्याने येत्या नगरपालिका निवडणुकीतही हेच प्रणाली लागू केली जावी ज्यामुळे अशा सर्वांनाच मतदान करण्याचा अधिकार मिळेल अशी अपेक्षा होती. परंतु या नगरपालिका निवडणुकीत घरपोच म तदान न झाल्यामुळे अनेक वृद्ध अपंग आणि गंभीर आजारी मतदारांना मतदान प्रक्रियेतून वगळण्यात येणार की काय? ही शक्यता वाढली आहे. त्यामुळे अशा मतदारांना निवडणुकीच्या दिवशीजऊ घरीच राहिले भाग पडणार आहे



अनेकांनी प्रशासनाकडून घरपोच मतदानाबद्दल माहिती मागितली परंतु त्यांना सांगण्यात आले की अशी कोणतीही सुविधा यंदा उपलब्ध नाही प्रत्येक मतदाराने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे यासाठी ही योजना महत्त्वाची आहे. नगरपालिका निवडणुकीआधी जिल्ह्यातील पाच नगरपालिका तसेच नगरपंचायत परिसरात मोठे बॅनर लावून जागरूकता मोहीम राबवली गेली परंतु मतदान केंद्रावर पोहोचू न शकणाऱ्या या जेष्ठ नागरिक दिव्यांगतसेच आजारी मतदारांसाठी विशेष व्यवस्था नसल्याने या मोहिमेला नागरिक केवळ औपचारिकता म्हणत नाराजी व्यक्त करीत आहेत. एक तर प्रचारासाठी उमेदवारांना केवळ चारच दिवसाचा अवधी मिळत आहे. या निवडणुकांमध्ये प्रत्येक वोट महत्त्वाचे असते. जर ज्येष्ठ नागरिक दिव्यांग तसेच आजारी व्यक्तींचे मतदान आधी झाले असते तर वेळेवर या उमेदवारांना धावाधाव करावी लागणार नाही तसेच मतदान केंद्रावर जाण्याचे हेलपाटे या ज्येष्ठ नागरिकांना दिव्यांगांना तसेच आजारी मतदारांना घालण्याची वेळ आली नसती परंतु आता नगरपालिकेची निवडणूक जवळ आल्यानंतरही या मतदारांना घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध नसल्याने मतदान कसे करावे हा मोठा प्रश्न या जेष्ठ नागरिक दिव्यांग तसेच आजारी मतदारांसमोर पडला आहे. त्यामुळे हे पाहता या मतदारांना सुद्धा विधानसभा आणि लोकसभा निवडणुकी सारखी घरपोच मतदानाची सुविधा उपलब्ध व्हावी अशी मागणी सामाजिक संघटना तसेच निवडणुकीत उभे असलेले उमेदवार करीत आहेत

## थोडक्यात

### शहरात पुरुषांच्या तुलनेत महिला मतदार अधिक



**अकोला:**आगामी अकोला महानगरपालिका निवडणुकीसाठी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार, २० प्रभागांपैकी, प्रभाग १४ मध्ये सर्वाधिक ३५, २०३ मतदार आहेत, तर प्रभाग १२ मध्ये सर्वात कमी २२, १२५ मतदार आहेत. पुरुष मतदारांपेक्षा महिला मतदारांची संख्या अधिक असल्याने, आगामी निवडणुकीत लाडक्या बहिणींची भूमिका महत्त्वपूर्ण ठरेल. प्रभाग महानगरपालिकेची रचना तयार करताना, शहराच्या एकूण लोकसंख्येला प्रभागांच्या संख्येने भागल्यावर येणाऱ्या संख्येपेक्षा लोकसंख्या टक्क्यांनी आहे.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा अकोला जिल्हा दौरा

**अकोला :** उपमुख्यमंत्री अजित पवार हे बुधवार दि. २६ नोव्हेंबर रोजी अकोला जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा खालीलप्रमाणे बुधवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी सकाळी ९ वाजता शिवणी विमानतळ येथे आगमन. तिथून अकोटकडे मोटारीने प्रयाण. सकाळी १० वाजता नेहरू मैदान, अकोट एसटी स्टँड जवळ, अकोट जि. अकोला येथे आगमन व जाहीर सभा. सकाळी ११ वाजता खामगावकडे प्रयाण.



## मनपा प्रशासन व्दारा पुर्व झोन अंतर्गत असलेल्या अतिक्रमणावर निष्कासनाची कारवाई



**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

अकोला महानगरपालिका क्षेत्रातील पुर्व झोन अंतर्गत असलेल्या संताजी नगर, सुधीर कॉलनी येथील खुल्या जागेवर नारायण सोनोने यांनी अतिक्रमण करून टीनशेड उभारले होते. आज दि. २५ नाव्हेंबर २०२५ रोजी मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ.सुनिल लहाने यांच्या आदेशान्वये सदरच्या अतिक्रमणावर नगररचना विभाग, पुर्व झोन क्षेत्रीय कार्यालय तसेच अतिक्रमण विभागाव्दारे पोलीस बंदोबस्तात निष्कासनाची कारवाई करण्यात आली आहे.सदर कारवाई पुर्व झोन सहा. आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात झाली असून कारवाईत सहा.अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा, सहा.पोलीस निरीक्षक गणेश उमक, कनिष्ठ अभियंता अक्षय बोर्डे, राहूल राऊत यांचेसह अतिक्रमण विभाग आणि पोलीस कर्मचा-यांची उपस्थिती होती.

## गुजराती समाजाच्या आयटीआय विद्यालयाचे थाटात उद्घाटन

**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

श्री अकोला गुजराती समाजाच्या बाभूळगाव येथील डेक्सन इन्स्टिट्यूट अर्थात डेक्सन आयटीआय विद्यालयाचे थाटात उद्घाटन करण्यात आले.गरजू विद्यार्थ्यांसाठी निर्माण करण्यात आलेल्या या आयटीआयच्या उद्घाटन प्रसंगी श्री अकोला गुजराती सम ाजाचे अध्यक्ष दिपेन शाह,दानदात्या श्रीमती जयश्रीबेन सुरेशभाई शाह,अमेरिका येथील दानदाते व्रजभाई अभेचंद लाठीया,व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.या सोहळ्यात सर्वप्रथम डेक्सन आयटीआय विद्यालयास आर्थिक सहकार्य करणारे स्व सुरेशभाई देवकरण शाह यांच्या पुतळ्याचा अनावरण सोहळा श्रीमती जयश्रीबेन सुरेशभाई शाह व कुटुंबाच्या उपस्थितीत टाळ्यांच्या गजरात पार पडला. या नंतर सोनल अँड व्रज लाठीया आयटीआय वर्कशॉप' दालनाचे उद्घाटन अमेरिका येथील दानदाते व्रजभाई अभेचंद लाठीया यांच्या हस्ते थाटात करण्यात आले.प्रास्तविक संस्थेचे




अध्यक्ष दीपेन शाह यांनी करून या सेवाभावी उपक्रमाची माहिती दिली.या नवनिर्मित आयटीआय मध्ये आठवी पाससाठी वेल्डर हा कोर्स तर दहावी पास असलेल्या विद्यार्थ्यांना सोलर टेक्निशियन, इलेक्ट्रिशियन व कॉम्प्युटर ऑपरेशन टेक्निशियन,कोपा हे एक वर्षाच्या मुदतीचे कोर्स शिकविण्यात येणार असून विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन केले.यावेळी व्रजभाई लाठीया यांनी आपले मनोगत व्यक्त केले.यावेळी श्रीमती जयश्रीबेन शाह व व्रजभाई लाठीया यांचा शाल श्रीफल व मोमेंट देऊन सत्कार करण्यात आला.संस्थेच्या वतीने यावेळी या प्रकल्पास सहकार्य करणारे परेशभाई सेदानी, नारायणदास लोढिया, विक्रम शाह, अनिल वोरा निमेश ठक्कर,तनसुखभाई पारेख, सनतभाई पटेल, सचिन पारेख, रघुभाई गगलानी,संजय मालविया, राजूभाई गांधी, हंसाबेन पारेख उपस्थित होते.

## अकोल्याच्या नाट्यप्रेमी साठी नवीन सुसज्ज सांस्कृतिक भवनाचे तीन महिन्यात लोकार्पण : आ. रणधीर सावरकर

### अकोला येथे ६४ व्या हौशी मराठी राज्य नाटय स्पर्धचे थाटात उद्घाटन

**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालया मार्फत आयोजित ६४ वी हौशी राज्य नाट्य स्पर्धा प्राथमिक फेरी अकोला येथील प्रमिलाताई ओक हॉल येथे सुरू झाली आहे

दिनांक २२ नोव्हेंबर ते ०९ डिसेंबरच्या दरम्यान ठरलेल्या रोजी संध्याकाळी ७ :०० वाजता , दु:०३.०० वा , व सकाळी ११.०० वा नाटकाचे प्रयोग सादर होणार असून या नाट्य स्पर्धे चे उद्घाटन नुकतेच स्थानिक आम दार रणधीर सावरकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यावेळी बोलताना सावरकर म्हणाले की. अकोल्यातील नाट्य चळवळ ही अतिशय ताकदीने काम करणारी असून या चळवळीला गेल्या पन्नास वर्षापासून महाराष्ट्र शासनाचा हॉल या शहरांमध्ये उपलब्ध नव्हता तो आम्ही यावर्षी सुसज्ज आणि सर्व सुविधायुक्त असा पुणे नागपूरच्या




धरतीवरचे नाट्य भवन रसिकांसाठी लवकरच लोकार्पण करीत असल्याचं यांनी सांगितलं.

त्यावेळी विचारपीठावर मधु जाधव अशोक ढेरे रमेश थोरात अरुण घाटोळे स्पर्धेचे समन्य क अमोल ताले महेश बगडिया विष्णू निंबाळकर विवेक वढसिगीकर आदीची उपस्थिती होती. सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे सांस्कृतिक कार्य संचालक श्री.विभीषण चवरे यांनी नमूद केलेले आहे.

या स्पर्धेमध्ये एकूण १४ संघांचा सहभाग असून अकोला, बुलढाणा, वाशीम, कारंजा येथील संघ या स्पर्धे त सहभागी होत आहेत. राज्यनाट्य स्पर्धेतील सर्व नाटकांना जास्तीत जास्त प्रेक्षकांनी उपस्थित रहावे आणि हौशी रंगकर्मींचा उत्साह वाढवावा असे आवाहन संचालक बिभीषण चवरे यांनी केलेले आहे. शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात वाजता ई-मेल फिमेल शनिवार २९ नोव्हेंबरला फ्रेंडशिप एक डिसेंबर ला रात मतरा दोन डिसेंबरला येईन चौक इत अर्धा रात्री बुधवार तीन डिसेंबरला विक्रमाचा घाता कक्ष सोमवार आठ डिसेंबरला गोपाळा रे गोपाळा नऊ डिसेंबरला अवघड जागेचं दुखणं नऊ दिसें संध्याकाळी ७ वाजता डोळे नसलेला अर्जुन. आदि नाटकांचे सादरीकरण होणार असून या सुवर्णसंधीचा लाभ अकोले करांनी घ्यावा असे आव्हान अमोल ता ले व महेश बगाडिया यांनी केले आहे.

## शहरातील विविध भागातील प्रतिष्ठानांसमोर उभी

### वाहनांची अतिक्रमणात भर



**▪अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :**

शहरातील विविध भागात प्रतिष्ठाने, हॉटेल समोर उभी वाहने अतिक्रमण समस्या जटिल बनवत आहेत. नागरिकांची डोकेदुखी त्यामुळे वाढली आहे. ही समस्या सोडवण्यासाठी महापालिका प्रशासन लक्ष देईल का हा खरा प्रश्न आहे.शहरातील वाढते अतिक्रमण ही समस्या झाली आहे. एखादे वाहन चुकीच्या पद्धतीने पार्क झाले तरी रस्ता ब्लॉक होतो. खरेतर वाहतूक सुरळीत राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. अकोला शहराचा विकास म्हणजे शॉपिंग मॉल, कॉम्प्लेक्स मोठ्या प्रमाणात उभे राहत आहेत. परंतु मुख्य म ार्गावर देखील पार्किंगची व्यवस्था नाही. नागरिकांची त्यामुळे नेहमी गैरसोय होते. ही समस्या तातडीने सुटणे गरजेचे आहे. त्याशिवाय नागरिकांना दिलासा मिळणार नाही. दुचाकी वाहनांविरूद्ध टोइंग पथक कारवाई करते परंतु कुठेही उभ्या राहणाऱ्या चारचाकी वाहनांवर कारवाई का केली जात नाही हा प्रश्न आहे.

# अकोल्याचा डिजिटल अभिमान : अभिषेक मानोरकर यांचे श्रीराम मंदिरावर लेझर शोचे अद्भुत दर्शन

## अयोध्येतील श्रीराम मंदिरावर प्रदर्शित केला 3D ॲनिमेशन आणि लेज़र शो

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

अयोध्या येथे उभारत असलेल्या श्रीराम जन्मभूमी मंदिराचे भव्य स्वरूप सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अकोल्यातील युवा डिजिटल कलाकार अभिषेक मानोरकर यांनी तयार केलेला लेझर शो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात चर्चेत आहे. उत्कृष्ठ तांत्रिक कौशल्य आणि सूक्ष्म दृष्टीकोनातून तयार केलेला हा लेझर शो रामभक्तांच्या मनात अभिमानाची भावना जागृत करणारे ठरत आहे.

या व्हिडिओमध्ये मंदिराचा प्रवेशद्वार, विस्तीर्ण प्रांगण, सभामंडप, शिल्पसज्ज खांब तसेच गर्भगृहाकडे जाणारा मार्ग यांचे अचूक आणि आकर्षक दर्शन दिले आहे. वास्तवदर्शी प्रकाशयोजना आणि वास्तूतील नक्षीकामाचे



बारकावे जपून केलेले हे प्रस्तुतिकरण लक्षवेधी ठरते. तसेच अयोध्येतील श्रीराम मंदिराच्या मुख्य शिखरावर श्री सीतारामजींची अद्भुत छटा तर लेझर शोमधून भगवान श्रीराम व माता सीतांच्या विवाहाचा प्रसंग सादर करण्यात आला.डिजिटल क्षेत्रात नव्याने पुढे येणाऱ्या तरुणांसाठी प्रेरणादायी ठरेल, अशा शब्दांत मानोरकर यांचे कौतुक होत आहे. परंपरा आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा सुंदर समन्वय साधत धार्मिक-सांस्कृतिक दृष्टीकोनातून त्यांनी केलेल्या या कामाचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, आगामी काळात अशा आणखी अनेक प्रकल्पांवर काम करण्याचा त्यांचा मानस असल्याचे कळते.अभिषेक मानोरकर यांच्या या सृजनशील डिजिटल योगदानामुळे अकोल्याची कला व कौशल्याची परंपरा नव्या आधुनिक रूपात उजळून निघत असल्याची भावना स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# चार्जिंगला लावलेल्या गाडीचा रात्री झाला स्फोट





■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

बाळापूर तालुक्यातील हातरुण येथे चार्जिंगवर ठेवलेल्या दुचाकी ई-व्हेईकलला रविवारी रात्रीच्या सुमारास भीषण स्फोट होऊन संपूर्ण गाडी जळून खाक झाली.

या आगीत गाडीचे हजारो रूपयांचे नुकसान झाले असून मोठा अनर्थ टळला आहे.थरकाप उडवणारी घटना हातरुण येथे घडली असून रोज ऐकू येणाऱ्या ई-वाहनांमध्ये लागणाऱ्या आगीच्या मालिकेत ही अजून एक धक्कादायक भर आहे. या घटनेत वाहन मालकाचे हजारो रुपयांच्या नुकसानींचा अंदाज असून, सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मोठा अनर्थ टळल्याने गावकऱ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला.स्फोटाच्या आवाजाने झोपेतून धावून बाहेर आले घरचे! काजीपुरा येथील काजी शाह खालिद खान (रफत खान) यांनी एक वर्षापूर्वी हिंदुस्तान पावर कंपनीची चार्जिंग गाडी विकत घेतली होती. नेहमीप्रमाणे रविवारी रात्री त्यांच्या मुलाने सुमारे रात्री १२ वाजता गाडी चार्जिंगला लावून झोप घेतली.

मात्र रात्री ३ वाजे दरम्यान जोरदार आवाज झाल्याने घरातील काजी मेहंदी हसन यांची झोप मोडली. ते बाहेर आले असता त्यांनी पाहिले की गाडीचा बॅटरी विभाग पेट घेऊन भडकलेला होता आणि आग संपूर्ण गाडीला वेढत होती. त्यानंतर मेहंदी हसन यांनी त्यांच्या भावाला व पुतण्याला जागे करून प्रयत्नपूर्वक आग आटोक्यात आणली. गाडी ज्या ठिकाणी ठेवली होती त्या जागी दररोज जनावरे बांधले जातात. परंतु सध्या थंडीमुळे ते तेथे नव्हते. ती असती तर या स्फोटात जिवंत जळण्याचा धोका निर्माण झाला. असता.सुरुवातीच्या तपासात बॅटरीमध्ये शॉर्ट सर्किट झाल्याने आग लागल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. गाडी, बॅटरी व इतर साहित्य मिळून हजारो रुपयांचे नुकसान झाले. गाडी रात्री चार्जिंगला लावून झोपू नका, खराब वायर, ढिले सॉकेट वापरू नका, चार्जिंग करताना जवळ कोरडी ज्वलनशील वस्तू ठेवू नका, शक्यतो टायमर स्विच वापरा, अशा सूचनाही देण्यात आल्या.

# हवामानात चढ-उतार सुरूच

**अकोला:** गेल्या आठवड्यापासून अकोला जिल्ह्याच्या तापमानात सतत चढ-उतार सुरू असल्याने थंडीची तीव्रता लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. गेल्या सात दिवसांत किमान तापमानाने मोठी कसरत केल्याचे दिसून येत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, हिवाळा नेमका आला की नाही? अशी चर्चा शहरभर सुरू आहे. गत आठवड्यापासून जिल्ह्यात थंडीचा जोर वाढला होता. त्यानुसार मंगळवारी किमान तापमान ११.९ अंश इतके खाली आले होते. या दिवशी शहरात गारवा, धुके आणि थंड वाऱ्याची चाहूल होती. बुधवारी तापमान किंचित वाढून १२.४ नोंदवले गेले. गुरुवार व शुक्रवार सलग दोन दिवस तापमान १२.८ राहिल्याने थंडीची मध्यम तीव्रता कायम होती.

# आकोट पोलीस स्टेशनच्या हद्दीतील खुल्या मटका चालू

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

येथील अकोट फाईल हद्दीतील लाडीस फाईल हनुमान मंदिराच्या गल्लीमध्ये खुलेआम टेबल वरली बुका चालू आहे हनुमान मंदिराच्या गल्लीमध्ये दोन्ही साईडने गरीब लोकांच्या वस्ती आहे लहान मुलं महिला वगैरे राहतात कुलर जाण्या इतका रस्ता आहे फक्त एवढा छोटा रस्त्यामधून गल्ली मधून दिवसभर वरली लावणाऱ्यांची गर्दी असते चुकविणे एखादा महिलेला धक्का लागला किंवा धावपळ झाली तर कायदा संस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो दोन्ही गल्लयांमध्ये हिंदू मुस्लिम राहतात दंगल झाल्यास कोण जबाबदार राहणार तरी जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी अकोट फाईल निरीक्षक यांना सूचना देऊन ताबडतोब बंद करण्यात सांगावे अन्य नागरिकांना एसपी ऑफिस समोर उपोषण ला बसावे लागेल जिल्हा पोलीस अधीक्षक चांडक साहेबांनी गुन्हेगारांना सळोकी पळवून सोडलेले आहेत अनेक गुन्हेगारांना ा डीसीपी अंतर्गत एक वर्षासाठी कोणाला दोन वर्षासाठी जेलमध्ये टाकलेले असतानाही संपूर्ण जिल्ह्यामध्ये एसपी साहेबांची वचक निर्माण झाली मात्र अकोला जिल्ह्यातील संपूर्ण अवैध धंदे बंद करा असा जिल्हा परिषद यांचा आदेश असतानाही आकोट फाईल ठाणेदार साहेब परमिशन दिलेले आहे सामान्य नागरिकांनी काय समजावे ठाणेदारांच्या परमिशनशिवाय कोणताही अवैध धंदा चालत नाही असं जिंकला ठामपणे माहित आहे जनतेने तक्रार कुणाकडे कळवा केली तर नाव सांगतात त्याच्यावर प्राण घातक आमले करतात जनतेने कोणाकडे तक्रार करावी असा प्रश्न निर्माण होतो तरी संपूर्ण अकोट पहिला दिन व विशेष करून ४० पहिला तला वरली मटका धंदा बंद करा त्या धंद्यामुळे त्या गल्लीतल्या लोकांना खूप जास्त मोठ्या प्रमाणात त्रास आहे व सांगणार कुणाला माननीय पोलीस अधीक्षक साहेब आपण सूचना देऊन ताबडतोब गाडी स्पेलिंग मधील धंदा बंद करायला सांगा धन्य बंध नाही झाला तर एसपी ऑफिस समोर अनेक नागरिक उपोषणाला बसतील.

# निवडणुकांमध्ये मतदारांनी सजग होण्याची गरज : गजानन हरणे

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जवळ येत निवडणुका असताना राजकारणात पुन्हा एकदा पैसा विरुद्ध कार्य हा जुना पण धगधगता प्रश्न डोके वर काढताना दिसत आहे. गावागावांत वषार्नुवर्षे लोकांच्या सुखदुःखात सहभागी होणारे, संकटात धावून जाणारे, निर्भिड सामाजिक कार्यकर्ते बाजूला पडतात तर पैसा, दिखावा आणि गटबाजी यांच्या बळावर उभे राहिलेले उमेदवारविजयी होतात, ही विसंगती आता उघडपणे जाणवू लागली आहे. निवडणुकीत पैसा वाटणारे उमेदवार लोकांसाठी नव्हे तर स्वतःच्या फायद्यासाठी गुंतवणूक करतात आणि नंतर ती अनेक पटींनी वसूल करतात, ही कटू वस्तुस्थिती आहे.

मतदारांनी जर सजग न राहता पैशावर किंवा तात्पुरत्या लाभावर आधारित मतदान केले, तर त्याचे परिणाम विकासकामांवर,



गावाच्या प्रगतीवर आणि पारदर्शकतेवर अपरिहार्यपणे उमटतात. लोकशाहीत मतदार राजा आहे; परंतु राजानेच जर आपले मत किमतीवर विकत दिले,तर खरी लोकशाही टिकेल कशी?

अनेक निष्ठावंत कार्यकर्ते आपल्या गावात मतदारसंघात मेहनतीने काम करून विश्वास कमावतात वषार्नुवर्षे सभा गाजवणारे, पोस्टर लावणारे, लोकांमध्ये प्रचार करणारे आणि पक्षाचा मानमरातब सांभाळणारे सैनिक निर्णायक क्षणी उपेक्षित राहतात. मतदारांनी पैशाच्या आकर्षणापेक्षा विकासाला, प्रामाणिकपणाला आणि सेवाभावाला प्राधान्य दिले, लोकांनी विचारपूर्वक मतदान केले, तर पैशांचा खेळ थांबेल व कार्यकत्यांना न्याय मिळेल, असे आवाहन त्यांनी केले. बदल मतदारांच्या हातात आहेनिवडणूक हा केवळ राजकीय उत्सव नाही ती गावाच्या भवितव्याची दिशा ठरवणारी प्रक्रिया आहे. जर मतदारांनीच पैशावर आधारित राजकारणाला पाठबळ दिले, तर भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि विकासाची घसरलेली गती यासाठी जबाबदार कोण? म्हणूनच सामाजिक: कार्यकत्यांच्या हक्काच्या लढ्याला आणि प्रामाणिक राजकारणाला पाठिंबा देण्यासाठी मतदारांनी जागरूक व्हावे, हीच खरी वेळ असल्याचे प्रतिपादन समाजसेवक गजानन हरणे यांनी जागृत मतदारांना, नागरिकांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# जिल्हातील ३५ गावामध्ये महिलांचे आरोग्य व सामाजिक समानता या विषयावर लोककला व पथनाट्या व्दारे जनजागृती

## स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठान,पातुर व्दारे सादरीकरण

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

महिला व बाल विकास विभाग महाराष्ट्र शासन अंगीकृत माहिला आर्थिक विकास महामंडळ,अकोला अंतर्गत लोक संचालित साधन केंद्र,पातुर, उरल बु.बाळापूर, तेल्हारा, अकोट, अकोला, मूर्तिजापूर, बार्शीटाकळी येथे नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास कार्यक्रमांतर्गत महिलांचे आरोग्य व सामाजिक समता या विषयावर लोककला व पथनाट्या व्दारे जनजागृती कार्यक्रम अकोला जिल्ह्यामधील ३५ गावांमध्ये सादरीकरण केले असुन सदर कार्यक्रम जिल्हा समन्वयक अधिकारी वर्षा खोब्रागडे यांच्या मार्गदर्शनाखाली व नीता अंभोरे यांच्या नेतृत्वामध्ये कार्यक्रम सादर झाले.



सदर कार्यक्रमाची सुरुवात ही पातुर शहरा पासुन झाली तर शेवट बार्शीटाकळी मधील पुनोती येथे झाला असुन जिल्ह्यामधील ९ लोक संचालित साधन केंद्रा अंतर्गत येणाऱ्या विविध गावांमध्ये लोककला व पथनाट्या व्दारे जनजागृती कार्यक्रम सादर केले आहेत सदर कार्यक्रम स्व.विनायक राखोंडे प्रतिष्ठाण,पातुर व लोक कलावंत सागर राखोंडे व संचातील वासुदेव महाराज यांच्या वेशभूषेत सुखदेव उपर्वट, शाहीर प्रकाश इंगोले, गजानन आवटे, श्याम उगले, गणेश उर्फ बाळू देवकर, कैलास शिरसाट, रवी कढोणे, सिद्धार्थ इंगळे, विष्णू सदार, अर्णव गाडगे, पल्लवी मांडवगणे, ज्योती राखोंडे, शुभांगी उमाळे व युवाश्री विशाल राखोंडे यांच्या नेतृत्वामध्ये संपन्न झाले आहेत त्यामध्ये लोककला व पथनाट्यातून महिलांचे आरोग्य व सामाजिक समानता आणि महिला सशक्तिकरण व हवामान लवचिकता व पोषण बाबत संवेदनशील दृष्टिकोनाबद्दल तसेच महिलांचे हक्क कर्तव्य अधिकार व महिलांचे शेतीच्या सात बारात व घराच्या नमुना आठ मध्ये महिलांचे नाव समाविष्ट व चढवणे आणि घराच्या नावाच्या पाठीवर महिलांचे नाव समाविष्ट करून त्याच्या सुद्धा नावाची पाटी लावणे तसेच सर्वांनी आपल्या घरोघरी परसबाग तयार करून सेंद्रिय फळबाग लागवड करून सेंद्रिय भाजीपाला खाल्ला पाहिजे आणि घरातील मुलगा मुलगी मध्ये समान हक्क अधिकार आणि मतभेद नष्ट करणे तसेच मुलीला शिक्षणाकरिता व नोकरीसाठी बाहेरगावी पाठवणे व महिला सक्षमीकरण व बचत गटाच्या माध्यमातून शेतीला जोड व्यवसायातून सक्षम करण्याकरिता बचत गटाच्या माध्यमातून विविध लघु उद्योग चालू करणे व हवामान बदला बाबत महत्वपूर्ण माहिती व सत्ता, संपत्ती व समान अधिकारा करीता महिलांचा पुढाकार या विषयी लोककला व पथनाट्यातुन आणि लोकगीताच्या माध्यमातून व विशेष म्हणजे की वेगवेगळ्या नाटिकेच्या माध्यमातून गावातील महिलांना व लोकांना माहिती देण्यात आली.

# १६० किमी सायकल एंड्युरन्स रायड यशस्वी पूर्ण

## राहुल दीपक पाटील लोणाग्रेकरचा उल्लेखनीय क्रीडा पराक्रम

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

अकोला जिल्ह्यातील लोणाग्रा येथील सदन कास्तकार दिपक पाटील यांचा मुलगा राहुल दीपक पाटील याने ठाणे येथे घोडबंदर सायकलिस्ट यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ऋठच १६० किमी एंड्युरन्स रायड या प्रतिष्ठित आणि कठीण सायकलिंग स्पर्धेत राहुल दीपक पाटील लोणाग्रेकर यांने आपले कौशल्य, चिकाटी आणि सहनशक्ती सिद्ध करत हे आव्हानात्मक अंतर अत्यंत यशस्वीरीत्या पूर्ण केले आहे. ही राईड महाराष्ट्रातील सर्वात आव्हानात्मक राईडपैकी एक मानली जाते. चढ-उतारांनी भरलेला मार्ग, सतत बदलणारे हवामान, वेगावर नियंत्रण आणि ऊर्जा व्यवस्थापनया सर्व अडथळ्यांवर मात करत राहुल यांनी १६० किलोमीटरचे अंतर ठरलेल्या वेळमर्यादेत पूर्ण केले. एंड्युरन्स राईडमध्ये केवळ शारीरिक तंदुरुस्ती नव्हे तर मानसिक ताकदीचीही परीक्षा असते आणि राहुल यांनी ती उत्तमरीत्या पार पाडली. रायडिंगदरम्यान त्यांनी टीम स्पिरिट, शिस्तबद्ध गती, सुरक्षित सायकलिंग नियमांचे पालन करत संपूर्ण प्रवास अत्यंत नेमस्तपणे पार पाडला.

त्यांच्या या कामगिरीमुळे सायकलिंगच्या क्षेत्रात त्यांचे नाव अधिक उज्ज्वल झाले आहे. राहुलच्या या यशाबद्दल कुटुंबीय, मित्रपरिवार, लोणाग्रेकरी व परिसरातील युवकांनी अभिमान व्यक्त केला असून अनेकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशाने स्थानिक तरुणांमध्ये फिटनेस आणि सायकलिंगची नवी प्रेरणा निर्माण झाली आहे. राहुल दीपक पाटील लोणाग्रेकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन!



# ३६ वी विभागीय पोलीस क्रीडा स्पर्धा : कुस्ती प्रकारात अकोला पोलीस दलाची दणदणीत कामगिरी

■अकोला,दि २५ (प्रतिनिधी) :

अमरावती विभागातील ३६ वी विभागीय पोलीस क्रीडा स्पर्धा दिनांक १८ ते २३ नोव्हेंबर २०२५ दरम्यान यवतमाळ येथे उत्साहात पार पडली. या स्पर्धेत अकोला पोलीस दलाने उल्लेखनीय कामगिरी करत महिला १२८ व पुरुष १८७ गुण मिळवत दोन्ही गटांमध्ये जनरल चॅम्पियनशिप पटकावत संपूर्ण विभागात आपले वर्चस्व सिद्ध केले. अमरावती विभागातील अमरावती ग्रामीण, अमरावती शहर, वाशिम, बुलढाणा आणि अकोला या पाचही पोलीस घटकांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.

या चमकदार यशाचे श्रेय अकोला जिल्ह्याचे मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांच्या दूरदर्शी नेतृत्वाला जाते, अत्यंत काटेकोर सराव, शिस्तबद्ध खेळ आणि संघभावना यांच्या जोरावर अकोला पोलीस संघाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. त्यांनी स्पर्धेपूर्वी खेळाडूंसाठी विशेष प्रशिक्षण सत्रांचे नियोजन केले. सराव मॅचेस, तांत्रिक मार्गदर्शन, रणनीतीची आखणी, खेळाडूंचा आत्मविश्वास वृद्धिंगत करणा-या सर्व गोष्टींमध्ये त्यांनी वैयक्तिक सहभाग घेतला. त्यांच्या प्रेरणेमुळे खेळाडूंमध्ये स्पर्धेपूर्वीच जिंकण्याची मानसिकता झाली. अकोला पोलीस दलाच्या खेळाडूंनी मैदानात आक्रमक खेळ करून आपली गुणवत्ता सिद्ध केली हॉकी, कबड्डी, फुटबॉल, बास्केटबॉल, खो-



खो, ॲथलेटीक्स, जलतरण, कुस्ती, बॉक्सींग, तायक्कांदो, वुशू, पावर लिफटींग, हडेल्स, रनिंग, उंची उडी, थाळी फेक, भाला फेक इत्यादी क्रीडा प्रकार तसेच विविध वैयक्तिक स्पर्धांमध्ये खेळाडूंनी विशेष लक्षवेधी कामगिरी केली. काही खेळाडूंनी अव्वल स्थान पटकावत विभागात अकोला पोलीस दलाचा नावलौकिक वाढवला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी पोलीस निरीक्षक गणेश जूमनाके, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील, तसेच गेम इन्चार्ज रवी ठाकूर यांनी अविरत परिश्रम घेतले. स्पर्धेला आकर्षक आणि अनुशासित स्वरूप देण्यासाठी फ्लॅग मार्च कुंदन इंगळे यांनी पार पाडला. संपूर्ण स्पर्धेत अकोला पोलीस दलाने भरघोस गुणांची कमाई करत उत्तम अशी कामगिरी सादर केली. या दमदार कामगिरीमुळे चॅम्पियनशिपचा मुकुट अकोलाच्या माथी चढला.स्पर्धेनंतर मा. पोलीस अधीक्षक श्री. अर्चित चांडक यांनी सर्व खेळाडूंना अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले. भविष्यातही याच जोमात, त्याच उत्साहात कामगिरी करून विभागात आणि राज्यात अकोला पोलीस दलाचे नाव उज्ज्वल करावे, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. खेळाडूंना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देत त्यांनी क्रीडा विकासाला आणखी चालना देण्याचे आश्वासन दिले. अकोला पोलीस दलाने केलेली ही ऐतिहासिक कामगिरी केवळ खेळातील यश नाही, तर संघटित शक्ती, शिस्त, परिश्रम आणि नेतृत्व या मूल्यांचे उत्तम उदाहरण आहे. या विजयामुळे विभागात अकोला पोलीस दलाचा दबदबा अधिक दृढ झ्याला आहे. ४०० मी. खालील प्रमाणे विविध खेळांत अकोला जिल्हा पोलीस दलाच्या खेळांडूंनी कामगिरी केली आहे. ॲथलेटिक्स (पुरूष) क्रिडा प्रकार क्रमांक रोहण गावंडे १०० मी. धावणे व २०० मी. धावणे प्रथम, वरद जोशी ३००० मी. स्ट्रीपल चेस प्रथम शंकर गडदे ५ हजार व १० हजार मी. धावणे प्रथम इमरान शहा उंच उडी प्रथम, साहिल मुलानी भाला फेक प्रथम, संतोश दाभाडे, गणेष कुहिले, रोहण गावंडे, वैभव तिवारी ४४०० मी. रिले प्रथम, गणेष कुहिले ३ हजार मी. स्ट्रीपल चेस व्दितीय, शिवकुमार शिरमे १० हजार मी. धावणे व्दितीय.

RNI NO-46973/1986
Mahasagar Akola
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak. Printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Kamala Square, Durga Chowk, Akola. **Group Editor-in-Chief and Managing Director** - Shrikrishna Tansukhdas Chandak, **Group Editor** - Sandeep Ramrao Kale, **Managing Editor** - Pankaj Shrikrishna Chandak. **Local Editor** Purushottam Madhukarrao Dhole Phone 9881489479 (Responsible for editorial as per PRB act). Head Office Phone 7447735851,9922970023.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७३/१९८८
महासागर अकोला
**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, ोमला स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, येथे प्रकाशित केले. **मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक**
**स्थानिक संपादक :** *पुरूषोत्तम **मधुकरराव** ढोले, फोन : ९८८१४८९४७९* **(पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी स्थानिक संपादकांची राहील.)**

## कमळाच्या मागे विकास...
# काँग्रेसच्या मागे भकास

### महसुलमंत्री बावनकुळेंची सडकून टीका

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
काँग्रेसकडे केवळ संभ्रमाचेच राजकारण करते. जनतेला सभ्रिमत करून मत मिळवण्याचा प्रयत्न करते. कमळाच्या मागे विकास, काँग्रेसच्या मागे भकास असल्याची टीका महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. ते प्रसार माध्यम प्रतिनिधींसोबत बोलत होते.



राज्यात सध्या सुरू असलेल्या राजकीय, न्यायालयीन आणि प्रशासकीय घडामोडींवर ते बोलत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकसित भारताचे स्वप्न देशासमोर ठेवले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसज यांनी २०४७ च्या विकसित महाराष्ट्राचे व्हिजन मांडले. त्यामुळे आम्ही जनतेकडे विकासाच्या आधारावर मत मागतो.

मात्र काँग्रेस केवळ संभ्रिमीत करून मते मिळवण्याचा प्रयत्न करीत आहे. आरक्षणा बाबत कोटार्चा निर्णय आम्ही मान्य करू. पण आमची ठाम मागणी आहे की ओबीसी समाजाला २७ आरक्षण मिळालेच पाहिजे.

मुंबईत तब्बल ११ लाख दुबार मतदार सापडल्याच्या अहवालावर प्रतिक्रिया देताना बावनकुळे म्हणाले,दुबार मतदार हे फक्त मुंबईचेच नव्हे तर महाराष्ट्रभर आहे. डिलीशनची प्रक्रिया वेळेत न होणे किंवा योग्यरित्या न पार पडणे, ही यामागची प्रमुख कारणे आहेत. एखादी व्यक्ती स्थलांतरित होताच नाव नवीन ठिकाणी नोंदवते. पूवीर्चे नाव कायम राहते. म्हणून दुबार नावे वाढतात. दुबार नावे असली तरी दुसऱ्यांदा मतदान होऊ शकत नाही. कारण मतदानावेळी बोटावर शाईची खूण केली जाते. मतदार याद्या अचूक करण्यासाठी निवडणूक आयोगाला विनंती करण्यात आली आहे, असेही बावनकुळे म्हणाले.

फुलंब्रीतील शिंदे सेनेच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराने भाजपात प्रवेश केल्याचा उल्लेख करताना ते म्हणाले, अशा गोष्टी अनेक ठिकाणी घडतात. भाजपचा एखादा कार्यकर्ता शिवसेनेत जातो, आणि शिवसेनेचा कार्यकर्ता भाजपमध्ये येतो. हा राजकीय प्रक्रियाचा भाग आहे.

तिकीट न मिळणे, संधींची मयार्दा, किंवा स्थानिक समीकरणांमुळे अनेकजण नवे पर्याय निवडतात. मात्र भाजप-सेना युती मजबूत आहे. निवडणुकीनंतर सर्वांसोबत चर्चा करून योग्य निर्णय घेतले जातील, असेही बावनकुळे म्हणाले. निवडणुकीनंतर मोठा निर्णय घेणार आहे. सर्व नगरपालिकांमध्ये पट्टेवाटप केले जाणार आहे.

बावनकुळेंनी यावेळी शिंदे गट - भाजपमधील पदाधिकारी एकमेकांच्या पक्षांत जाण्याच्या मुद्यावरही प्रकाश टाकला. काही ठिकाणी असे प्रकार सुरू आहेत. भाजपचा एखादा कार्यकर्ता शिवसेनेत जात आहे, तर शिवसेनेचा एखादा पदाधिकारी भाजपत येत आहे. विदर्भातही अशी २०-२५ उदाहरणे घडली आहेत. तिकीट मिळाले नसल्याने लोक दुसरा एखादा पर्याय शोधत राहतात. त्यातून असे प्रकार घडतात. पण भाजप, शिवसेना व राष्ट्रवादीची आमची महायुती अत्यंत मजबूत आहे. निवडणुकीनंतर या प्रकरणी सर्वांना विश्वासात घेऊन चर्चा केली जाईल, असे ते म्हणाले.

## चारचाकीच्या धडकेत गेले तीन जीव...
# माता-पिता आणि मोठा मुलगा ठार

■ महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि.२५ :
सेलूकाटे परिसरावर काळाने झडप घालून एका सुखी कुटुंबाचा संसारच उद्धवस्त केल्याची हृदय पिळवटून टाकणारी घटना सोमवारी रात्री घडली.

वर्धा-सेलूकाटे मार्गावर नवोदय विद्यालयाजवळ भरधाव चारचाकी वाहनाने दुचाकीस जोरदार धडक दिल्याने पती-पत्नी व त्यांच्या अल्पवयीन मुलाचा जागीच मृत्यू झाला. तर आणखी एक ६ वर्षीय मुलगा गंभीर जखमी असून त्याच्यावर सावंगी (मेघे) येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मृतांमध्ये सेलूकाटेतील भोयर कुटुंबाचा समावेश आहे. या दुर्घटनेत सोमनाथ भोयर (वय ३८), निकिता सोमनाथ भोयर (वय ३२) आणि मुलगा पूरब (वय १२) यांचा जागीच मृत्यू झाला. तर लहान मुलगा कान्हा (वय ६) गंभीर जखमी असून त्याची प्रकृती गंभीर असल्याचे वैद्यकीय अधिका?यांनी सांगितले.

प्राथमिक माहितीनुसार, भोयर कुटुंब वर्धा गणेशनगर येथील एका कार्यक्रमावरून रात्रीच्या सुमारास दुचाकीवरून आपल्या सेलूकाटे येथील घरी परतत होते. याचदरम्यान वायगाव येथील एक चारचाकी वाहन भरधाव वेगाने येऊन त्यांच्या दुचाकीवर आदळले. धडक इतकी भीषण होती की दुचाकीचे अक्षरशः तुकडे तुकडे झाले होते.

धडक दिल्यानंतर चारचाकीचालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती असून वाहन वायगाव येथील असल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी स्थानिक नागरिकांनी संताप व्यक्त केला.

### ६ वर्षाच्या कान्हाची झुंज



दुर्घटनेनंतर घटनास्थळी मोठी गर्दी जमा झाली होती. जखमी मुलगा कान्हाला नागरिकांनी तातडीने सावंगी रुग्णालयात हलविले. मात्र उर्वरित कुटुंबीयांना वाचवण्याचे नागरिकांचे सर्व प्रयत्न अपयशी ठरले. सेलू आणि काटे परिसरात या घटनेने शोककळा पसरली असून गावात एकच हळहळ व्यक्त होत आहे. अचानक एका कुटुंबाचा आवाज कायमचा थांबला अशी खंत व्यक्त होत आहे.

गेल्या काही महिन्यांत वर्धा-सेलूकाटे मार्गावर वेगामुळे अपघातांची संख्या वाढली असून नागरिकांनी वाहतूक नियमांचे पालन आणि कठोर अंमलबजावणीची मागणी केली आहे. वाहतूक पोलिसांनी तातडीने वेगमर्यादा आणि तपासणी सुरू करावी, अशी प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली. सावंगी पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

## व्याघ्रप्रकल्पाच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर विश्रांतीगृह

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पातील पर्यटनाच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर आता सर्व सुविधायुक्त विश्रामगृह बांधले जाणार आहे. विशेष म्हणजे हे विश्रामगृह खासगी नाही तर वनखात्याकडून बांधले जाणार आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनीच ही घोषणा केल्यामुळे आता खासगी रिसॉर्टचालकांचे धाबे दणाणले आहेत.



ताडोबा-अंधारी व्याघ्रप्रकल्पासह देशभरातील सर्वच व्याघ्रप्रकल्पालगत खासगी रिसॉर्टचालकांचे रिसॉर्टचे जाळे निर्माण झाले आहे. अनेक रिसॉर्ट हे पंचतारांकित, सप्ततारांकित आहेत. त्यात अनेक सुविधा निर्माण करून देण्यात आल्या आहेत. हायप्रोफाईल पर्यटकांपासून तर सेलिब्रिटी पर्यटक याच रिसॉर्टमध्ये मुक्काम करतात. अगदी सरकारी अधिकारी, आमदार, खासदार, मंत्री, मंत्र्यांचे खासगी सचिव, प्रधान सचिव अशी सगळ्यांची पसंती या खासगी रिसॉर्टला असते.

सरकारी विश्रामगृह असताना सुध्दा या विश्रामगृहकडे पाठ फिरवली जाते. दरम्यान, आता खुद्द वनमंत्री गणेश नाईक यांनीच व्याघ्रप्रकल्पाच्या प्रत्येक प्रवेशद्वारावर सर्वसुविधायुक्त विश्रांतीगृह बांधण्याचा निर्णय घेतला आहे.

पर्यटकांसाठी या विश्रामगृहात सर्व सुविधा असणार आहेत. वनखात्याच्या अधिकाऱ्यांना त्यांनी तशा सूचनाही दिल्या आहेत. मात्र, वनमंत्र्यांनी घोषणा केली तरीही ही बाब शक्य आहे का, असा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे खासगी पंचतारांकित काही रिसॉर्टना वनखात्याचेच अभय आशीर्वाद आहे. या रिसॉर्टचालकांकडून त्यामुळेच मनमानी कारभार सुरू आहे. त्यांच्या पर्यटनासाठी खासगी गाड्या आहेत. पर्यटन नसलेल्या जंगलात वाहने टाकणे, कोणत्याही वेळी पर्यटन करणे, पर्यटनांदरम्यान मोबाईल बंदी असतानाही मोबाईलचा वापर करणे असे अनेक प्रकार या रिसॉर्टचालकांकडून केले जातात. मात्र, त्यावर कुणाचेही बंधन नसल्याचे दिसून येते.

## शिवणगावात दुसऱ्यांदा भूकंपसदृश्य धक्के

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २५ :
मागील दोन महिन्यांपासून तिवसा तालुक्यातील शिवणगाव येथे भूकंपसदृश्य धक्के जाणवत आहेत. दरम्यान शनिवार व रविवारी मध्यरात्री तर सलग धक्के जाणवले. यातही रविवारी रात्री ११ वाजून १९ मिनिटांनी आतापर्यंतचा सर्वाधिक तीव्रतेचा धक्का जाणवल्यामुळे गावकरी धास्तावले आहेत.

रविवारची रात्री अनेक गावकऱ्यांनी जागून काढली. रविवारी मध्यरात्री गावामध्ये तहसीलदारांसह शासकीय यंत्रणा पोहचली होती. तसेच सोमवारी खासदार, आमदारांनी गाव गाठून परिस्थिती जाणून घेतली.

शिवणगाव हे सुमारे पाच हजार लोकसंख्येचे नागपूर महामार्गावर गाव आहे. या गावात सुमारे दीड महिन्यांपूर्वी पहिल्यांदा असे सौम्य धक्के जाणवले होते. त्यानंतर आपोआप सामान्य होते. ऑक्टोंबर महिन्यात असेच धक्के जाणवल्यानंतर ह्यजिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडीआह्नला सुद्धा याबाबत जिल्हा प्रशासनाच्यावतीने कळवण्यात आले होते. त्यामुळे जिओलॉजिकल सर्वे ऑफ इंडियाच्या तज्ज्ञांनी गावात पाहणी केली. मात्र महीना उलटला तरी त्यांचा अहवाल जिल्हा प्रशासनाला प्राप्त झाला नाही.

दरम्यान शनिवार ते रविवार या रात्रभरात तीनवेळा तसेच रविवारी रात्री ११.१९ वाजता जोरदार धक्के जाणवले, त्यामुळे ग्रामस्थ धास्तावलेले आहेत. दरम्यान घटनेची माहिती मिळताच खासदार बळवंत वानखडे, आमदार राजेश वानखडे, तहसीलदार डॉ. मयूर कळसे, गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, संजय देशमुख यांनी गावात भेट दिली. गावात भूकंपमापक यंत्र बसवण्यात येणार असल्याचे तिवसाचे तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांनी सांगितले.

## भाजलेल्या रुग्णाची रुग्णालयाच्या छतावरुन उडी

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. २५ :
दोन दिवसांपूर्वी जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलेल्या रूग्णाने रुग्णालयाच्या इमारतीच्या छतावरून उडी घेत आयुष्य संपवले. अंग भाजल्यामुळे होणाऱ्या वेदना असह्य झाल्याने त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. अखिल मरसकोल्हे (वय २३) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. हा तरुण मध्यप्रदेशातील तिरोडीचा रहिवासी होता.



अखिल मरसकोल्हे या तरुणाचं अंग भाजल्यामुळे त्याला भंडारा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. मात्र, वेदना असह्य झाल्याने तरुण मानसिक तणावाखाली गेला. त्याची मानसिक अवस्था ढासळत चालली होती. मंगळवारी सकाळी रुग्ण अचानक वॉर्डमधून बाहेर पडला आणि थेट जिल्हा रुग्णालयाच्या छतावर गेला. अंदाजे ४० ते ५० फूट उंचीवरून पडल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्याला तातडीने रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात हलवण्यात आलं. मात्र, प्रचंड रक्तस्राव आणि गंभीर मेंदूच्या जखमेमुळे उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. पोलिसांनी पंचनामा करून या प्रकरणात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे. घटना घडताच रुग्णालय परिसरात एकच गोंधळ उडाला होता.

रुग्णाच्या उडी मारण्याचा थरार दाखवणारा व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आल्याने खळबळ उडालीय. व्हायरल होत असलेल्या व्हिडीओमध्ये तरुण इमारतीच्या कठड्याला लटकलेला दिसतो. खाली त्याचे नातेवाईक व आजूबाजूचे लोक थांबलेले होते. तरुण उडी मारण्याच्या बेतात असल्याचं लक्षात येताच इमारतीखाली अनेक लोक जमले.

## काचेची मंदिरं बनविणारा अवलिया

लोकमानस

कोणत्याही प्रकारची काच म्हणजे खर तर टाकाऊ वस्तू परंतु याच काचेपासून सुंदर आणि सुबक कलाकृती बनवितात ते जगावेगळे अवलिया कलाकार. कारण या कलाकारांची दृष्टी हि जगाच्या पलीकडली असते. असाच पेशाने अभियंता असलेला परंतु अंगी अद्भुत कला असलेला अवलिया कलावंत म्हणजे मोहनलाल सोलंकी वडिलांकडून काचेपासून मंदिर बनविण्याचा वारसा मिळाल्यानंतर गेल्या चार दशकात तब्बल पाच हजार मंदिर बनविणारा अभियंता मोहनलाल सोलंकी यांची भटकंती सुरू आहे.



पोट भरण्यासाठी गावोगावी फिरणाऱ्या सोलंकी यांच्यासह चार कुटुंब सध्या पाल ठोकून राहुरी येथील नांदूर रस्त्यालगत मुक्कामी आहे.पालावर महिला, पुरूष व मुले काचेपासून मंदिर बनवितात.बनविलेले मंदिर व शो पीस घरोघरी जाऊन विकताना कलाकार म्हणून सन्मानही मिळतो, तर काही ठिकाणी कमी किमतीसाठी घासाघीस करतांना कटू अनुभवही येतात.

सोळंकी यांनी वयाची ६५ वर्षे पूर्ण केली असली तरी काचेपासून मंदिर तयार करण्यात त्यांचा हातखंडा आहे. मंदिर बनविण्यासाठी आकारानुसार वेळ लागतो. मोठे मंदिर बनविताना दोन दिवस लागतात. याउलट दिवसाला दोन लहान मंदिर होतात. भोपाळ (मध्यप्रदेश) येथील सोळंकी यांची नातेवाईकांसह आठ महिने महाराष्ट्रासह अन्य राज्यात भटकंती सुरू असते. पावसाळ्यात गावी मोलमजुरी करून उपजीविका करावी लागते. सरकारने दिलेल्या जागेवर बांधलेल्या घरात चार महिने मुक्काम असतो.मंदिर बनविण्यासाठी काच, फेविकॉल, कटर हे तीन घटक महत्त्वाचे आहेत. भटकंतीच्या काळात सोळंकी यांना या वस्तू स्थानिक बाजारपेठेत सहज उपलब्ध होतात.

मंदिर किती आकाराचे बनवावे?, याचा आराखडा मनात तयार होतो. त्यानंतर काच कटरच्या सहाय्याने कापून सांगाडा तयार केला जातो. काचेवर आकर्षक तुकडे जोडले जातात. त्यामुळे सुबक मंदिर तयार होण्याचा मार्ग मोकळा होतो.

मंदिर बनविण्यासाठी घरातील महिला व मुलेही तरबेज आहेत. दिवसभर मंदिर बनविण्याचे काम सुरू असते. मंदिर तयार झाले की शहर अथवा गावात त्याची विक्री केली जाते. घरोघरी भटकंती करतांना तयार केलेल्या मंदिराला चांगली किंमत मिळेल, याची अपेक्षा असते.दिलदार ग्राहक कलेची कदर करीत योग्य मोबदला देतात. याउलट घासाघीस करणारे ग्राहक अत्यल्प मोबदला देतात.

दोन हजार पेक्षा अधिक गावांमध्ये सोळंकी यांनी भटकंती करीत मंदिरांची विक्री केली. सोळंकी यांच्याबरोबर भाचा मनू राठोड, गंगाराम राठोड, शंकर राठोड यांचेही कुटुंब भटकंती करते. एकूणच सोलंकी सारखा अवलिया कलाकार आपल्या काचेच्या मंदिरामुळे मुलखावेगळा ठरतो नाही का?

■ ■ ■




## आयरस टेक्नोलोजीच्या एआय बॅटरीमुळे Jouletap चा इव्ही फ्लीट अधिक सक्षम

एआय संचालित बॅटरी विश्लेषण आणि ऊर्जा बुद्धिमत्ता उपायांमध्ये आघाडीवर असलेल्या आयरस टेक्नोलोजीने घोषणा केली की त्यांनी Jouletap सोबत एक वर्ष यशस्वीरित्या काम केले आहे. Jouletap हा इलेक्ट्रिक वाहनांसाठी लिथियम बॅटरी सोल्यूशन्सचा एक अव्वल प्रदाता आहे.

आयरसच्या प्रमुख प्रेक्षा प्लॅटफॉर्ममुळे या भागीदारीमुळे ऑपरेशन्समध्ये मोठी सुधारणा झाली आहे. यामुळे भारताच्या वेगाने वाढणाऱ्या इव्ही इकोसिस्टममध्ये बॅटरी मॅनेजमेंट सिस्टम उत्कृष्टतेसाठी नवीन मानके निश्चित होतात.

भारत त्याच्या इलेक्ट्रिक मोबिलिटी ध्येयांकडे वेगाने वाटचाल करत असताना, फ्लीट ऑपरेटर, उत्पादक आणि अंतिम वापरकर्ते अजूनही इव्ही बॅटरी किती विश्वासार्ह आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या आहेत याबद्दल खूप चिंतेत आहेत. आयराससच्या प्रेक्षा तंत्रज्ञानाचा वापर करून, ज्युलेटॅप दाखवते की स्मार्ट बॅटरी विश्लेषण कसे ऑपरेशन्स अधिक सुरळीतपणे चालवू शकते आणि दररोजच्या वापरकर्त्यांसाठी इलेक्ट्रिक वाहतूक अधिक सुरक्षित आणि अधिक विश्वासार्ह बनवू शकते. ■ ■ ■

## असा लागला मोबाईलचा शोध

भ्रमणध्वनी हे एक इलेक्ट्रॉनिक्स उपकरण (यंत्र) असून याचा दूरसंचारासाठी उपयोग केला जातो. याला इंग्रजीमध्ये मोबाईल फोन (मोबाईल) किंवा सेल्युलर फोन (सेल फोन) असे म्हणतात.



भ्रमणध्वनीच्या साहाय्याने संभाषणाची व माहितीची देवाणघेवाण करता येते. आज भ्रमणध्वनी माणसाच्या जीवनाचा एक महत्वाचा भाग बनलेला आहे.

पारंपरिक दूरध्वनी उपकरणे घरामध्ये एकाच जागी ठेवून वापरावी लागतात. जगातील पहिला मोबाईल फोन मोटोरोला कंपनीच्या मार्टिन कूपर ह्या व्यक्तीने १९७३ साली विकसित केला व वापरून दाखवला. १९९० साली जगभरात १.२४ कोटी मोबाईल फोन वापरकर्ते होते. २००९ सालाअखेरीस हा आकडा ४.६ अब्ज इतका आहे. सध्या विकसित देशांमधील १०० व्यक्तींपैकी ९७ तर जगातील १०० व्यक्तींपैकी ४५ व्यक्ती मोबाईल फोन वापरतात.आधुनिक काळातील मोबाईल फोन हे संभाषणाखेरीज महाजाल (इंटरनेट) न्याहाळणे, लेखी लघुसंदेशांची देवाणघेवाण, गाणी ऐकणे, छायाचित्र काढणे, रेडियो ऐकणे, जीपीएस वापरणे, पैसे देणे, काढणे इत्यादी कामांकरिता वापरले जातात.

नोकिया, मोटोरोला, ॲपल, सीमेन्स, सॅमसंग या मोबाईल फोन उत्पादक कंपन्यांपैकी काही सर्वात मोठ्या कंपन्या आहेत. दूरसंचारविषयक सेवांसाठी मोबाईल फोनमध्ये सिम कार्ड वापरणे आवश्यक असते. भ्रमणध्वनीमुळे माणसे जोडली गेली आहेत. मोबाईलमुळे सर्व जग जवळ आले आहे. मोबाईल स्थितीचे स्थान स्थान-आधारित सेवांसाठी वापरले जाऊ शकते. याला मोबाईल फोन ट्रॅकिंग असे म्हणतात.

■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## रेल्वे रुळावर कोसळली पाण्याची जीर्ण टाकी

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. २५ :
शेगाव परिसरातील जलंब रेल्वे स्थानक जवळील जीर्ण पाण्याची टाकी थेट रेल्वे रूळावर कोसळली तसेच विद्युत वाहक तारा क्षतिग्रस्त झाल्या. त्यामुळे खामगाव ते जलंब रेल्वेमार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली.



दरम्यान रेल्वे प्रशासनाने युद्ध पातळीवर उपाय योजना केल्याने सोमवारी संध्याकाळी उशिरा वाहतूक व परिस्थिती पूर्व पदावर आली. सोमवारी, २४ नोव्हेंबरला सायंकाळी उशिरा हा अभूतपूर्व घटनाक्रम घडला.

शेगाव तालुक्यातील जलंब येथून मुंबई ते नागपूर लोहमार्ग गेला आहे. रजतनगरी असलेल्या खामगावला जलंब येथून रेल्वे मार्ग जोडला आहे. तेथील मालधक्क्यावर मालगाडी जाते. तसेच जलंब ते खामगाव शटल रेल्वे सेवादेखील सुरू असते. जलंब येथील रेल्वे स्थानक परिसरात असलेल्या रेल्वे कर्मचारी वसाहतीला पाणीपुरवठा करणारी जुनी पाण्याची टाकी होती.

ती मोडकळीस आल्याने व कालबाह्य झाल्याने ती पाडण्याचे काम एका ठेकेदाराकडे सोपविण्यात आले होते. टाकी पाडताना रेल्वे ट्रॅकवर पडणार नाही, याकरिता विरुद्ध बाजूला ताण लावण्यात आले होते. मात्र ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे म्हणा वा दुदैर्वाने म्हणा त्या टाकीचा भार रेल्वे ट्रॅक (रुळा )कडे जास्त झुकल्यामुळे टाकी काही क्षणातच रेल्वे रुळावर कोसळली. टाकी कोसळताना विद्युत तार व देखील क्षतीग्रस्त झाले.

यामुळे रेल्वे ट्रॅकचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले दरम्यान, खामगाव ते जलंब रेल्वे सेवा काही काळ विस्कळीत झाली .

या अनपेक्षित घटनेनंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने दुरुस्तीचे काम हाती घेतले . खामगाव ते जलंब मार्गादरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना काही काळ मनस्ताप सहन करावा लागला. त्यांना आपल्या गंतव्य स्थळी जाण्यासाठी अखेर अन्य मार्गाचा आधार घ्यावा लागला.

सुदैवाने टाकी लुप लाईन (रुळावर) पडल्याने आणि रेल्वे प्रवासी वाहतूक करणाऱ्या रुळावर न पडल्याने काल सोमवारी संध्याकाळी उशिरा परिस्थिती पूर्व पदावर आली. रेल्वे प्रशासनाचे आपत्कालीन यंत्रणा व नियोजन किती जलद व सक्षम असते हे या घटनेमुळे पुन्हा एकवार दिसून आले.

## नागपूर शहरातून चारजण तडीपार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
अवैधरीत्या दारू विकणाऱ्यांवर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून परिमंडळ ५ चे पोलिस उपायुक्त निकेतन कदम यांनी तीन महिलांसह चौघांना तीन महिन्यांसाठी शहरातून तडीपार केले आहे.

रिता उर्फ शितल अर्जुन मोटघरे (३३) गोपाल वाटीकासमोर, पुनापूर रोड, संतोष उर्फ सरवन शंकर उईके (२८) कुंभार मोहल्ला, डिप्टी सिग्नल, सुनिता राजेश सोनकुसरे (२९) धरमनगर चौक आणि सरोज नरेश विश्वकर्मा (४०) डिप्टी सिग्नल या त्यांच्या परिसरात अवैधरीत्या दारू विक्री करीत होत्या.

कारवाई करून देखील त्यांचे अवैध धंदे सुरूच राहिल्याने त्यांना तीन महिन्यांसाठी शहरातून तडीपार करण्यात आले. अवैध व्यवसाय करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी कंबर कसली आहे. २२२

